# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

## **साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**



सकाळ

६

# सियाचीन प्रश्न सोडविता आला असता...

## वीरमाता अनुराधा गोरे यांचे प्रतिपादन; राजगुरुनगर येथे व्याख्यान

राजगुरुनगर, ता. १ : "सियाचीनचा प्रश्न १९७१ मध्ये भारताने पाकिस्तानविरुद्ध युद्ध जिंकल्यावर सोडविता आला असता; पण तसे झाले नाही त्यामुळे आपण याठिकाणी मोठ्या प्रमाणात सैनिक गमावत असतो आणि साधनसामग्रीवरही मोठा खर्च करावा लागतो,'' असे प्रतिपादन वीरमाता अनुराधा गोरे यांनी केले.

येथील साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सियाचीनचे वास्तव' विषयावर बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक ॲड. मुकुंदराव आवटे, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एन. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

राजगुरुनगर (ता. खेड) : 'सियाचीनचे वास्तव' विषयावर बोलताना अनुराधा गोरे.

त्या म्हणाल्या, ''जगात सर्वात दुर्गम युद्धभूमी असलेल्या सियाचीनमध्ये भारतीय सैनिकांची लढाई प्रथम निसर्गाशी असते. मग शत्रूशी असते. कारण इथल्या निसर्गाने लढाईपेक्षा जास्त बळी घेतले आहेत. सैनिक जेव्हा सियाचीनच्या तळावर जातात तेव्हा थोडे असतात व जिवंत जेव्हा परत येतात तेव्हा ते विजेते असतात.''

"विद्यार्थ्यांनी सैनिकांचे आपल्यासाठीचे बलिदान विसरू न देता या देशाच्या प्रगतीसाठी आपलाही हातभार लावायला हवा. आपण छोट्या छोट्या गोष्टींनी नाराज न होता लढण्याची ताकद मनात निर्माण करायला हवी. आपल्या मनाची व विचारांची क्षमता वाढवायला हवी. आजचा विद्यार्थी हा उद्याचा या देशाचा आधारस्तंभ असून तो शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असायला हवा. त्यासाठीची शिक्षणपद्धती तयार व्हायला हवी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सूत्रसंचालन प्रा. संजय माने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. संजय शिंदे यांनी केला. मधुरा वाघ हिने आभार मानले.



प्रभात | पुणे जिल्हा | मंगळवार, दि. ३१ जानेवारी २०१७

# सियाचीनमध्ये प्रथम निसर्गाशी मग शत्रुशी लढाई

## वीरमाता अनुराधा गोरे यांचे प्रतिपादन : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात स्मृती व्याख्यानमाला

राजगुरुनगर, दि.३० (प्रतिनिधी) - जगातील सर्वात उंच, थंड व कठीण युद्धभूमी असलेल्या सियाचीनमध्ये भारतीय सैनिकांची लढाई प्रथम निसर्गाशी असते, मग शत्रूशी असते. कारण इथल्या निसर्गाने लढाईपेक्षा जास्त बळी घेतले आहेत, असे प्रतिपादन वीरमाता अनुराधा गोरे यांनी केले.

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सियाचीनचे वास्तव' या विषयावर गोरे बोलत होत्या. यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक ॲड. मुकुंद आवटे, मुरलीधर खांडरे, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एन. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

अनुराधा गोरे म्हणाल्या की, सियाचीनवर सैनिकांना देशासाठी जबाबदारी पार पाडणे अत्यंत जिकिरीचे काम असून ते जेव्हा ९० दिवसांच्या मोहिमेवर जातात तेव्हा थोडे असतात व जिवंत परत येतात तेव्हा ते विजेते असतात. या भागात कसलेच जिवंतपणाचे लक्षण नसून रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे यांच्याशी संबंध तुटलेला असतो. प्रचंड थंडी, ऑक्सिजनचे अत्यल्प प्रमाण, [illegible] कोसळणारे हिमकडे, हिमवादळे, [illegible] त्या सैनिकांच्या देहावर व मनावर मोठा परिणाम होत असतो. या पार्श्वभूमीवर आपले सैनिक जीवाची बाजी लावून देशसेवेत कुठेही कमी पडत नाही असे त्या म्हणाल्या. लेह, लडाख, [illegible], सियाचीनचे प्रवेशद्वार, नुब्रा व्हॅली, श्योकव्हॅलीबद्दलही त्यांनी माहिती सांगितली. अनुराधा गोरे म्हणाल्या की, सियाचीनवर शहीद झालेल्या सैनिकांच्या कथा सांगताना अधिकाधिक भारतीयांना सियाचीन हे क्षेत्र, त्यातील संघर्ष, इथल्या सैनिकांना कोणती किंमत मोजावी लागते, या सगळ्यांचा उपाय काय याची माहिती करून घेण्याची गरज व्यक्त केली. सियाचीनमधील दीर्घकाळ संघर्षाचा परिणाम पर्यावरणावर होत असून दोन्ही देशातील सैनिक आणि साधनसामुग्रीची मोठी हानी होत आहे. त्याला पर्याय भारत व पाकिस्तानने या ठिकाणाला पीसपार्क करून या भागाचं अस्तित्व, [illegible], नैसर्गिक पर्यावरण सौंदर्य अबाधित राखायला हवे अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय माने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. संजय शिंदे यांनी केला, तर आभार मधुरा वाघ हिने मानले.

### देशभक्तांचे बलिदान व्यर्थ जाऊ देऊ नका

विद्यार्थ्यांनी सैनिकांचे आपल्यासाठीचे बलिदान विसरू न देता या देशाच्या प्रगतीसाठी आपलाही हातभार लावायला हवा. आजचा विद्यार्थी हा उद्याचा या देशाचा आधारस्तंभ असून तो शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असायला हवा. त्यासाठीची शिक्षणपद्धती तयार व्हायला हवी. भारतमातेच्या सेवेसाठी माझ्या मुलाला शहीद झाल्याचे भाग्य लाभले, असे सांगून देशभक्तांचे बलिदान व्यर्थ जाऊ देऊ नका, असे वीरमाता अनुराधा गोरे यांनी सांगितले.

जनप्रवास ३
शुक्रवार, दि. ३ फेब्रुवारी २०१७

# सियाचीनची लढाई आधी निसर्गाशी मग शत्रूशी : गोरे



राजगुरुनगर । वार्ताहर

जगातील सर्वात उंच, थंड व कठीण युध्दभूमी असलेल्या सियाचेनमध्ये भारतीय सैनिकांची लढाई प्रथम निसर्गाशी असते मग शत्रूशी असते. कारण इथल्या निसर्गाने लढाईपेक्षा जास्त बळी घेतले आहेत असे प्रतिपादन वीरमाता अनुराधा गोरे यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सियाचेनचे वास्तव' या विषयावर त्या बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक अॅड. मुकुंदराव आवटे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अनुराधा गोरे बोलताना पुढे म्हणाल्या की, सियाचेनवर सैनिकांना देशासाठी जबाबदारी पार पाडणे अत्यंत जिकरीचे काम असून ते जेव्हा नव्वद दिवसांच्या मोहिमेवर जातात तेव्हा योद्धे असतात व जिवंत जेव्हा परत येतात तेव्हा ते विजेते असतात. या भागात कसलेच जिवंतपणाचे लक्षण नसून रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे यांच्याशी संबंध तुटलेला असतो. प्रचंड थंडी, ऑक्सिजनचे अत्यल्प प्रमाण, मधूनच कोसळणारे हिमकडे, हिमवादळे, किरणोत्साराचा धोका, आसपासच्या चौक्यांवरचे अपघात या सगळ्याचा त्या सैनिकांच्या देहावर व मनावर मोठा परिणाम होत असतो. या पार्श्वभूमीवर आपले सैनिक जीवाची बाजी लावून देशसेवेत कुठेही कमी पडत नाही असे त्या म्हणाल्या. लेह, लडाख, बारामुल्ला, सियाचेनचे प्रवेशद्वार, नुब्रानदी, नुब्राव्हॅली, श्योकव्हॅलीबद्दलही त्यांनी माहिती सांगितली. सियाचेनवर शहीद झालेल्या सैनिकांच्या कथा सांगताना अधिकाधिक भारतीयांना सियाचेन हे क्षेत्र, त्यातील संघर्ष, इथल्या सैनिकांना कोणती किंमत मोजावी लागते, या सर्वांवर उपाय काय याची माहिती करून घेण्याची गरज व्यक्त केली. सियाचेनमधील दीर्घकाळ संघर्षाचा परिणाम पर्यावरणावर होत असून दोन्ही देशातील सैनिक आणि साधनसामुग्रीची मोठी हानी होत आहे. त्याला पर्याय भारत व पाकिस्तानने या ठिकाणाला पीसपार्क बनवून या भागाचं अप्रतिम, अवर्णनीय, नेत्रदीपक पर्वतीय सौंदर्य अबाधित राखायला हवं अशी भावना त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी सैनिकांचे आपल्यासाठीचे बलिदान विसरू न देता या देशाच्या प्रगतीसाठी आपलाही हातभार लावायला हवा. आपण छोट्या छोट्या गोष्टींना जात न होता लढण्याची ताकद मनात निर्माण करायला हवी. आपल्या मनाची व विचारांची क्षमता वाढवायला हवी. आजचा विद्यार्थी हा उद्याचा या देशाचा आधारस्तंभ असून तो शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असायला हवा. त्यासाठीची शिक्षणपद्धती तयार व्हायला हवी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. भारत मातेच्या सेवेसाठी माझ्या मुलाला शहीद होण्याचे भाग्य लाभले असे सांगून देशभक्तांचे बलिदान व्यर्थ जाऊ देऊ नका असे आवाहन शेवटी त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

संध्या बुधवार, दि. १ फेब्रुवारी २०१७ | ७

# सियाचेनची लढाई आधी निसर्गाशी मग शत्रूशी : अनुराधा गोरे

राजगुरुनगर, (किरण खुडे) : जगातील सर्वात उंच, थंड व कठीण युध्दभूमी असलेल्या सियाचेनमध्ये भारतीय सैनिकांची लढाई प्रथम निसर्गाशी असते, मग शत्रूशी असते. कारण इथल्या निसर्गाने लढाईपेक्षा जास्त बळी घेतले आहेत, असे प्रतिपादन वीरमाता अनुराधा गोरे यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सियाचेनचे वास्तव' या विषयावर त्या बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक अॅड. मुकुंदराव आवटे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अनुराधा गोरे बोलताना पुढे म्हणाल्या की, सियाचेनवर सैनिकांना देशासाठी जबाबदारी पार पाडणे अत्यंत जिकरीचे काम असून, ते जेव्हा नव्वद दिवसांच्या मोहिमेवर जातात तेव्हा योद्धे असतात व जिवंत जेव्हा परत येतात तेव्हा ते विजेते असतात. या भागात कसलेच जिवंतपणाचे लक्षण नसून रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे यांच्याशी संबंध तुटलेला असतो. प्रचंड थंडी, ऑक्सिजनचे अत्यल्प प्रमाण, मधूनच कोसळणारे हिमकडे, हिमवादळे, किरणोत्साराचा धोका, आसपासच्या चौक्यांवरचे अपघात या सगळ्याचा त्या सैनिकांच्या देहावर व मनावर मोठा परिणाम होत असतो. या पार्श्वभूमीवर आपले सैनिक जीवाची बाजी लावून देशसेवेत कुठेही कमी पडत नाही असे त्या म्हणाल्या. लेह, लडाख, बारामुल्ला, सियाचेनचे प्रवेशद्वार, नुब्रानदी, नुब्राव्हॅली, श्योकव्हॅलीबद्दलही त्यांनी माहिती सांगितली. सियाचेनवर शहीद झालेल्या सैनिकांच्या कथा सांगताना अधिकाधिक भारतीयांना सियाचेन हे क्षेत्र, त्यातील संघर्ष, इथल्या सैनिकांना कोणती किंमत मोजावी लागते, या सर्वांवर उपाय काय याची माहिती करून घेण्याची गरज व्यक्त केली. सियाचेनमधील दीर्घकाळ संघर्षाचा परिणाम पर्यावरणावर होत असून दोन्ही देशातील सैनिक आणि साधनसामुग्रीची मोठी हानी होत आहे. त्याला पर्याय भारत व पाकिस्तानने या ठिकाणाला पीसपार्क बनवून या भागाचं अप्रतिम, अवर्णनीय, नेत्रदीपक पर्वतीय सौंदर्य अबाधित राखायला हवं, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय माने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. संजय शिंदे यांनी केला तर आभार कु. मधुरा वाघ या विद्यार्थीनीने मानले.

७ Regd. No. PCW/002/2015-2017 RNI No. 1755/57

केसरी राष्ट्रीय ठेवा

बुधवार, १ फेब्रुवारी २०१७, पुणे C (शहर आवृत्ती)

# सियाचीनची लढाई आधी निसर्गाशी, मग शत्रूशी : अनुराधा गोरे

राजगुरुनगर, (वार्ताहर) : जगातील सर्वात उंच, थंड व कठीण युध्दभूमी असलेल्या सियाचीनमध्ये भारतीय सैनिकांची लढाई प्रथम निसर्गाशी असते मग शत्रूशी असते. कारण इथल्या निसर्गाने लढाईपेक्षा जास्त बळी घेतले आहेत, असे प्रतिपादन वीरमाता अनुराधा गोरे यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सियाचीनचे वास्तव' या विषयावर त्या बोलत होत्या. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक अॅड. मुकुंदराव आवटे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. बी. जाधव, परीक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

गोरे म्हणाल्या की, सियाचीनवर सैनिकांना देशासाठी जबाबदारी पार पाडणे अत्यंत जिकरीचे काम असून ते जेव्हा नव्वद दिवसांच्या मोहिमेवर जातात तेव्हा थोडे असतात. मोहिमेवरून जेव्हा जिवंत परत येतात तेव्हा ते जिंकले असतात. या भागात कसलेच जिवंतपणाचे लक्षण नसून रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे यांच्याशी संबंध तुटलेला असतो. प्रचंड थंडी, ऑक्सिजनचे अत्यल्प प्रमाण, मधूनच कोसळणारे हिमकडे, हिमवादळे, किरणोत्साराचा धोका, आसपासच्या वातावरणाचे अचानक याचा सैनिकांच्या देहावर व मनावर मोठा परिणाम होत असतो. या पार्श्वभूमीवर आपले सैनिक जीवाची बाजी लावून देशसेवेत कुठेही कमी पडत नाही.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख